वर्ष बारावे : अंक १२ : डिसेंबर २०२३



# कॉक्लिआ वार्ता



Years

# COCHLEA WARTA



Volume Twelve : Issue 12 : December 2023 Total Pages : 16 Rs. 10/-



दिवाळी उत्सव - मंचर आणि राजगुरूनगर केंद्र



दिवाळी उत्सव - फोंडा, गोवा.



दिवाळी उत्सव - कुडाळ केंद्र



दिवाळी उत्सव - फोंडा, गोवा



दिवाळी उत्सव - मंचर आणि राजगुरूनगर केंद्र



दिवाळी उत्सव - कुडाळ केंद्र



दिवाळी उत्सव - कुडाळ केंद्र



दिवाळी उत्सव - नारायणगाव





कुटुंब दिनानिमित्त आलेले पालक अभिप्राय लिहितांना

# कॉक्लिआ वार्ता

वर्ष बारावे अंक १२



**संपादक**

डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**

सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**

मृदुल हेमंत बापट
गौरी कुलकर्णी
रसिका बाळासाहेब शिंदे

**मुद्रण**

पॉझिटिव्ह एंटरप्रायझेस,
३९०/बी-१, जी-२,
दत्तधाम अपार्टमेंट,
फडके प्रकाशनाच्या समोर,
नारायण पेठ, पुणे - ३०

**मुखपृष्ठ व सजावट**

सौ. मानसी दाते


## अंतरंग


**Editorial** 4
Mrs. Manasee Date

**कुटुंब दिन : कॉक्लिआ च्या कर्णबधिर मुलांच्या विकासातील सुवर्ण दिन** 5
सौ. रक्षा देशपांडे

**अभ्यासक्रम** 7
गौरी कुलकर्णी

**आगळावेगळा कुटुंब दिन** 9
स्नेहलता संदीप सोनवणे

**कल्पनेपलिकडील कुटुंब दिन !!!** 11
कुणाल आनंद शिंदे

**Events** 12

**Our Centers** 14



| | | |
|---|---|---|
| **Printed By** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |
| **Published By** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |
| **Owned By** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Printed At** | : | Positive Enterprises<br>390/B G-2, Dattadham Apts.,<br>Opp. Phadke Prakashan, Narayan Peth,<br>Pune - 411030 |
| **Published At** | : | Cochlea Pune for Hearing and Speech<br>161-A, Modibaug, Shivsagar Society,<br>Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411016 |
| **Editor** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |

# Editorial

"Family", does this word just mean "hum do hamare do"?
In India mostly family means grand parents , parents, uncles, aunts, cousins and ofcourse siblings. Hence the bond of being together and sharing joys and sorrows.

But in case of hearing impaired children, it becomes total responsibility of the mother. In Marathi there is a proverb, "radaka mool Aaicha", nobody wants a crying baby, only the mother will take care. Similarly the hearing impaired child was ignored by other members in the family. In spite of all this the mothers have been bringing their child to Swaranaad as they could see their bright future being developed by dedicated teachers.

But this scenario changed a lot after the first Family day organised last year. This year also "Family Day" was organised in Swaranaad. Most of the family members of the children attended. They were shown the classrooms and activities. They were very much impressed with the charts all over the walls. They had interactions with the teachers and they came to know the efforts taken by the teachers to develop these children, and also why the mother is so keen to take them to Swaranaad.

Raksha Deshpande madam and Abhilasha Agnihotri madam motivated the family members about how their involvement in the child will take the child to higher levels in life. One of the mother has given a write up in this issue about the change in her mother in law after "Family Day". She says, "now my mother in law does not watch the TV in the evenings, but spends all her time playing with the grand child". One of the father has also given a write up in this issue.

There, is no doubt that the teachers are giving 100% but the family also plays an important roll in the child's development as they are with the family before and after the school.
Every year if this "Family Day", transforms so many indifferent family members to attentive family members, there is no doubt that the HI child will be happy and will flourish in life.

**Mrs. Manasee Date**

## कुटुंब दिन : कॉक्लिआ च्या कर्णबधिर मुलांच्या विकासातील सुवर्ण दिन

नमस्कार,

भारतीय संस्कृतीमध्ये कुटुंब हा समाजाचा कणा आहे. कुटुंब व्यवस्था ही भारताच्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. आई-वडिलांच्या बरोबरीने कुटुंबातील इतर सदस्यांचे महत्त्व या कुटुंब व्यवस्थेत फार महत्त्वाचे असते. अशा या कुटुंब व्यवस्थेबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी, त्याचबरोबर त्याचे महत्त्व समजावण्यासाठी कॉक्लिआ पुणे स्वरनाद पुनर्वसन केंद्रात मागील वर्षापासून आपण कुटुंब दिन साजरा करत आहोत. यावर्षी देखील दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ या दिवशी स्वरनाद कोथरूड केंद्रामध्ये हा कुटुंब दिन अतिशय उत्साहात साजरा केला गेला. त्याला अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद पालकांकडून मिळाला.

कर्णबधिर बालकाच्या जडणघडणीमध्ये कुटुंबाचे खूप मोठे योगदान असते. बालकाच्या बोलण्याच्या, ऐकण्याच्या तसेच समजण्याच्या वाटचालीत कुटुंबाचा खूप मोठा हात असतो. कुटुंबातील व्यक्तींनी जर त्या बालकाचे कर्णबधिरत्व स्वीकारले तर त्याच्या आईवडिलांसाठी पुढील मार्ग हा सुलभ होतो कारण त्या बालकाच्या सगळ्या चाचण्या, श्रवण यंत्र व प्रशिक्षणासाठी आईने त्याची नियमित ने – आण करणे; तसेच त्याच्या शिक्षणासाठी घरी कामाच्या व्यापातून वेळ काढणे, इत्यादी गोष्टींसाठी घरातील इतर सदस्यांची खूप मोठ्या प्रमाणात मदत हवी असते. त्याचप्रमाणे मूल कर्णबधिर आहे म्हटल्यावर पालक या नात्याने जो आघात होतो त्यातून बाहेर काढण्यासाठी कुटुंबातील या सदस्यांचा खूप मोलाचा वाटा असतो. बरेच वेळेला कर्णबधिर मूल असलेले पालक हे कमी वयाचे आणि कमी अनुभव असणारे असतात त्यांना कळत नाही आता काय करावे? पुढे कोणताही मार्ग दिसत नाही, सगळे संपल्यासारखे वाटते, माझ्याच नशिबी हे का? तुझ्यामुळे असे झाले, अशा प्रकारचे आरोप - प्रत्यारोप चालू होतात. त्यातून बाहेर काढण्यासाठी कुटुंबातील व्यक्तींची खंबीर साथ हवी असते. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत तुम्ही पुढे व्हा !! असे आश्वासक शब्द हवे असतात. त्या साथीनेच हे आई - वडील पुढचे मार्गक्रमण करू शकतात. खूप मोठी शक्ती या कुटुंबातील व्यक्तींमध्ये असते; कुटुंब दिवसा निमित्त आजी - आजोबा काका – काकू, मामा – मामी, आत्या - मामा अशा कुटुंबातील सर्व सदस्यांना कॉक्लिआ पुणे स्वरनाद पुनर्वसन केंद्रात बोलावून आम्ही त्यांना कॉक्लिआ संस्थेची माहिती सांगितली. त्यांच्या घरातील कर्णबधिर बालकाचा स्वरनाद मधील प्रवास दाखविला, आमच्याकडे उपलब्ध असणाऱ्या सुविधा व त्यांचे महत्त्व त्यांना समजावून सांगितले, पालकांच्या व्हिडिओ क्लिप दाखवल्या. फक्त आईच नव्हे तर घरातील इतर सदस्यही बालकाच्या वाचाभाषा वाढीसाठी कसे मदत करू शकतात, हे सांगितले. यशस्वी कर्णबधिर विद्यार्थ्यांचे व्हिडिओ दाखविले, जेणेकरून आपलेही बालक अशा प्रकारे यशस्वी होऊ शकते हा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये म्हणजेच पालकांमध्ये निर्माण होईल.

संस्थेत उपलब्ध असणाऱ्या निरनिराळ्या तज्ञ व्यक्तींनी प्रत्येक थेरपीचे महत्त्व पटवून दिले. मागील दोन वर्षांपासून स्वरनाद मध्ये वाचाभाषा प्रशिक्षणाच्या बरोबरीने खूप सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. जसे की, ऑक्युपेशनल थेरपी, ऑडिओ वरबल थेरपी (AVT), समुपदेशन इत्यादीची माहिती तसेच त्याचे महत्त्व सांगितले. स्वरनादच्या मुख्याध्यापिकांनी प्रवेश प्रक्रिया तसेच वर्षभर नियमित संस्थेत येणे किती गरजेचे आहे, ते सांगितले. मोटिवेशनल व्हिडिओ दाखविण्यात आले व शेवटी प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला.

अतिशय उत्तम व सूत्रबद्ध रीतीने संपूर्ण कार्यक्रम पार पडला. स्वरनाद मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अतिशय छान नियोजन केले होते. सुंदर, देखण्या अशा या कुटुंब दिनाची सांगता अतिशय सकारात्मक वातावरणात झाली..

धन्यवाद,

**सौ. रक्षा देशपांडे,**
शिक्षण संचालिका – कॉक्लिआ पुणे.

**Your generosity can make a deaf child speak**

Your Contribution can be directly sent to :

**"Cochlea Pune for Hearing and Speech"**

| | | |
|---|---|---|
| FCRA Reg No. | : | 083930399 |
| PAN No | : | AAATC 5056E |
| Bank | : | Bank of Maharashtra |
| Branch | : | Shivajinagar, Pune |
| A/C No | : | 60040230428 |
| IFSC Code | : | MAHB 0001150 |
| MICR Code | : | 411014041 |

Cochlea Pune for Hearing and Speech
Cordially inviting you to the
**Annual Day Celebration**
Sunday, 21st January 2024 at 4.00 pm
**Venue :** Swami Vivekanand Auditorium, MIT College, Kothrud, Pune - 38
**RSVP :** communicationofficer98@gmail.com
Whatsapp : 7499032453

# अभ्यासक्रम

अभ्यासक्रम हा शिक्षण प्रक्रियेचा आत्मा आहे असे म्हटले जाते. अभ्यासक्रम म्हणजे विद्यार्थ्याला ठराविक कालावधीत ठरवलेल्या उद्दिष्टाकडे घेऊन जाण्याची प्रक्रिया आहे. मोठमोठे विचारवंत, अभ्यासक एकत्र येऊन सर्वसाधारणपणे अभ्याक्रम ठरवताना मुलाचे वय, सर्वसाधारण बौद्धिक क्षमता, इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन अभ्यासक्रम ठरवतात. पण काही कमतरतांमुळे काही मुले या सर्वसाधारण अभ्यासक्रमाचा भाग होऊ शकत नाहीत; अशा वेळी शिक्षकांना या मुलांना शिकवण्यासाठी वेगळा अभ्यास सक्रम बनवावा लागतो.

अभ्यासक्रम बनवताना शिक्षकांना मुलाचे वय , मुलाची गरज , मुलाची क्षमता या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात, त्याच बरोबर अभ्यासक्रम अद्ययावत, ध्येयाधिष्टीत, सर्वसमाविष्टीत, एकात्मिक, सृजनशील असावा या गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात.

काही अक्षमता असणाऱ्या मुलांचा अभ्यासक्रम ठरवताना काही तात्विक मुद्दे डोळ्यासमोर ठेवले जातात जसे कि, काही अक्षमता असणारी व्यक्ती / मुले हे समाजाचा एक अविभाज्य घटक आहेत आणि त्याला / तिला समाजात सन्मानाने आणि समाजाचा एक उपयोगी घटक म्हणून समाजात वावरण्यासाठी सक्षम बनवायचे आहे, तसेच त्याच्या अक्षमता लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी विविध गोष्टींचा अंतर्भाव अभ्याससक्रमात केला गेला पाहिजे. जसे व्यवसाय उपचार(Occupational Therapy), वाचा उपचार(Speech Therapy) , भौतिक उपचार(Physiotherapy) , वर्तन उपचार(Behaviour Therapy) इत्यादी.

एकदा का अभ्यासक्रम निश्चित झाला कि त्यात निरनिराळ्या विषयांच्या तज्ञाच्या बरोबरीने घरातील सर्व मंडळींचाही सहभाग अत्यंत आवश्यक आहे. सगळ्यांच्या प्रयत्नातूनच मूल त्याच्यातील असणाऱ्या अक्षमतांवर मात करुन एक उत्तम आयुष्य जगू शकणार आहे.

२०२३ -२०२४ या शैक्षणिक वर्षापासून म्हणजेच जून २०२३ पासून कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग अँड स्पीच संचालित स्वरनाद पुनर्वसन केंद्र येथे ३ ते ६ वयोगटातील कर्णबधिर मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे. जून पासून ते नोव्हेंबर या कालावधीत रंग, आकार, सण, भाज्या, फळे, फुले, देव, पाळीव प्राणी, जंगली प्राणी, पक्षी, चव, ऋतू, नातेवाईक, कुटुंब अशा विविध विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम एकाच वेळी ठरवलेल्या विषयानुसार मुलांच्या पातळीनुसार सर्व वर्गांमध्ये घेतला जातो. विषयाशी संलग्न शैक्षणिक साहित्यांनी शाळा सजवली जाते व त्या अनुषंगाने स्थळ भेटी केल्या जातात. प्रत्यक्ष वस्तू/पदार्थ मुलांना हाताळायला, खायला दिल्या जातात त्यामुळे मुलांच्या मनात त्या त्या गोष्टीचे

दृढीकरण होते आणि मुलाला शिकवलेली गोष्ट चांगली समजते. अशा प्रकारच्या अभ्यासक्रमामुळे मुलांचे त्या त्या विषयातील अनुभूती / आकलन चांगले झाले असून मुलांच्यात शब्द संपदा पण वाढली आहे.

या अभ्यासक्रमामुळे मुलांच्यात चांगली प्रगती होताना तर दिसतच आहे पण त्याच बरोबर शिक्षकांमधील सृजनशीलता ही वाढीस लागली आहे. विषयाशी संलग्न काय शैक्षणिक साहित्य बनवता येईल, स्थळ भेट कोठे करता येईल, याचा विचार त्यांच्या मनात सतत चालू असतो. हसत खेळत एखादा विषय शिकवण्यासाठी छोटेसे बडबड गीत शिक्षक स्वतः बनवतात; त्या गीताला सुंदर चाल लावतात असे विविध उपक्रम / मार्ग शिक्षक सतत शोधत असतात. त्यामुळे मुले आणि शिक्षक यांच्यात आलेला उत्साह या सहा महिन्यात प्रकर्षाने जाणवत आहे. मुलांमध्ये होणारी प्रगती ही खूप प्रमाणात आहे याचा दाखला पालक, नातेवाईक नेहमी देत असतातच पण हा विकास शिक्षकांच्याही नजरेत भरतो आहे आणि शिक्षकांना अधिकाधिक सृजनशील होण्यास भाग पाडत आहे.

**गौरी कुलकर्णी,**
प्रशासकीय अधिकारी,
स्वरनाद कोथरूड.

**प्रश्नमंजुषा - 5**

1. कुटुंब दिन झाल्यानंतर शिवमच्या कुटुंबियांनी त्यांच्यामध्ये केलेले कोणतेही 3 बदल सांगा.

2. दिवाळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कोणास आमंत्रित करण्यात आले होते ?

3. संपादकीय लेखात कोणत्या म्हणीचा उल्लेख करण्यात आला आहे ?

**नोव्हेंबर महिन्याच्या प्रश्नमंजुषेची विजेती आहे सौ. मेघा कदम.**

## आगळावेगळा कुटुंब दिन

नमस्कार,

मी स्नेहलता संदीप सोनवणे म्हणजे स्वरनाद शाळेत शिकत असलेल्या शिवम संदीप सोनवणे ची आई शिवम चं नाव सांगणं मला गरजेचं वाटतं कारण अशा अनेक महिला आहेत ज्यांना वाटतं की माझा मुलगा खूप त्रास देतो, शांत बसत नाही, काही ना काही उचापत्या चालूच असतात तर हा लेखनाचा खटाटोप त्यांच्या सगळ्यांसाठी

माझा मुलगा शिवम हा यावर्षीच्या जानेवारीपासून शाळेत येतो आहे. जेव्हा तो शाळेत प्रवेशित झाला त्यावेळी एका जागी बसणं हे त्याला माहीतच नव्हतं, तिथूनच खरी आमची सुरुवात झाली ती आत्ता वर्गात शांत बसून अभ्यास करण्यापर्यंत त्याच्यात खूप बदल झाला आहे. हे फक्त आपली शाळा व आपले शिक्षक तसेच ताई यांच्यामुळे झाले आहे. या सगळ्या प्रवासात फक्त मी आणि माझा मुलगा होतो पण या महिन्यात म्हणजेच नोव्हेंबर महिन्यात शाळेमध्ये कुटुंब दिन साजरा करण्यात आला त्या दिवशी शिवमचे बाबा आणि आजी आले होते.


शिवम ची आजी प्रथमच शाळेत आल्या होत्या. त्यांना शाळा खूप आवडली. आधी फक्त मी व शिवमच एकमेकांशी बोलायचो आणि अभ्यास सुद्धा मीच घ्यायचे पण कुटुंब दिवस होता त्या दिवशी सर्व शिक्षिका, थेरपिस्ट ताई आणि रक्षाताई यांनी इतक्या सोप्या व कळेल अशा शब्दात कुटुंबातील व्यक्तींना काही गोष्टी समजावल्या. आजी आणि बाबांनी पूर्ण शाळा बघितली. ग्रंथालयातली वेगवेगळी चित्र आणि चार्ट बघून आजींना खूप वेगवेगळ्या कल्पना सुचत होत्या. कुटुंब दिवस झाल्यापासून शिवमचे बाबा रोज शाळेत काय शिकवलं हे शिवमला विचारतात. त्याच्यासोबत छान गप्पा मारतात, त्याच्या प्रत्येक प्रश्नांची उत्तरे देतात. आजी तर टीव्ही बंद करून सगळा वेळ त्याच्यासोबत घालवतात. घरात असलेल्या सगळ्या ॲक्टिविटी करून घेतात. आज काय काय केलं शाळेमध्ये या विषयावरही त्यांच्या दोघांच्या छान गप्पा होतात. मुलांना रात्री झोपताना गोष्टी सांगा हे ताईंनी सांगितल्यापासून रोज रात्री छोटी मोठी गोष्ट आजी शिवमला सांगते. कुटुंब दिवस साजरा झाल्यापासून घरातले वातावरणच बदलले आहे आणि त्याचा चांगला उपयोग शिवम साठी होणार हे नक्की !!!

याच प्रमाणे प्रत्येक कर्णबधिर मुलाच्या सर्व घरातल्यांचा सहभाग असेल तर मुलांची प्रगती व्हायला वेळ लागणार नाही. आपली सर्वात मोठी शाळा म्हणजे आपलं स्वतःचं कुटुंबच.. चांगले संस्कार हे मॉलमध्ये नाही तर कुटुंबात मिळतात, फक्त कुटुंबातील व्यक्तींना आपल्या मुलांना कोणत्या प्रकारे सांभाळायचे आहे, त्यांचे कशाप्रकारे संगोपन करायचे आहे, ते समजायला हवे आणि स्वरनाद शाळेमधील कुटुंब दिनापासून ही गोष्ट शिवमचे बाबा आणि आजी दोघांना समजली.


त्यामुळेच आमच्या घरातील वातावरण पूर्ण बदलले आहे आणि या बदलासाठी शाळेतून खूप छान मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल मी शाळेची आभारी आहे.

कुटुंबापेक्षा मोठं कोणतंही धन नाही,
वडिलांपेक्षा मोठा कोणी सल्लागार नाही..
आई पेक्षा मोठी कोणती सावली नाही,
आजी पेक्षा चांगली आपल्याला कोणी जपणारी नाही..
आजोबांसारखे आपले हट्ट कुणी पुरवणार नाही,
भावापेक्षा चांगला कोणी भागीदार नाही..
बहिणीपेक्षा चांगली कोणी शुभचिंतक नाही,
स्वरनाद शाळेइतकी कोणती चांगली शाळा कुठेही नाही..

**स्नेहलता संदीप सोनवणे**
पालक, स्वरनाद कोथरूड.


कुटुंबदिनाबद्दल अभिप्राय


सर्व उपक्रम अतिशय चांगले वाटले.
सर्व शिक्षक, कर्मचारी चांगले प्रकारे
मुलांकडे लक्ष्य देत आहेत.
माझा मुलगा राजवर्धन मध्ये
चांगली प्रगती आहे. कुटुंबदिनाच्या
उपक्रम खुप सुंदर वाटला.
सर्वांचे मनापासून धन्यवाद.
सुनिल दामोदर यादव


कुटुंबदिनाबद्दल अभिप्राय

आमच्या कुटुंबदिन खूप छान पद्धतीने साजरा केला गेला आहे.
कार्यक्रमाच्या कालावधी थोडा अजून जास्त हवा होता. आज खूप छान माहिती मिळाली.
माझा मुलगा मला बाबा आणि त्याच्या आईला आई बोलतो. हे ऐकून होणारा आनंद शब्दात सांगू शकणार नाही.
आपल्या सर्वांचे मनापूर्वक धन्यवाद
किशोर केशव कोळी


कुटुंबदिनाबद्दल अभिप्राय

अतिशय चांगला अनुभव होता. स्वरनाद
ही संस्था आपले 100% देत आहे. अतिशय
उत्तम नियोजन या संस्थेने आखले करण्यात
आले होते. मला माझ्या पाल्याच्या
शाळेत असे वाटले नाही की आपला
पाल्य बोलू शकत नाही. मला आता
विश्वास वाढल्या सारखे वाटले.
मी खरंच या संस्थेचे
आभार मानतो
धन्यवाद.


कुटुंबदिनाबद्दल अभिप्राय

हा कार्यक्रम खूप छान होता. "प्रत्येकाने
मुलासाठी वेळ काढणे गरजेचे आहे" हे
या कार्यक्रमात समजले. हे सर्वांना प्रत्येकाला
माहीत असते पण या कार्यक्रमामुळे प्रत्येकाला
त्याचे Motivation पण भेटले.

# कल्पनेपलिकडील कुटुंब दिन !!!

स्वरनाद पुणे यांनी २५ नोव्हेंबर २०२३ रोजी केलेला कुटुंब दिनाचा कार्यक्रम हा अतिशय छान आणि सुंदर होता. कुटुंब या संकल्पनेवर केलेला हा कार्यक्रम आम्हालासुद्धा खूप आवडला. या संकल्पनेमुळे विद्यार्थ्यांना कुटुंबाबद्दल तर आपुलकी निर्माण होणारच पण पालकांना देखील ही जाणीव झाली की आपण आपल्या पाल्यासाठी कसलीही कारणे न देता पाल्याला जेवढा जमेल तेवढा सगळा वेळ दिला पाहिजे.( जमेल तेवढा नाही तर दिलाच पाहिजे)

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षक वर्गाने छान स्वागत केले. आपुलकीने वागणूक दिली. सर्वांना शाळेतील विविध विभागांची माहिती दिली. त्यामुळे पालकांना पण आपल्या पाल्याच्या शाळेबद्दल व त्याच्या शिक्षकांच्या मेहनतीबद्दल खूप काही गोष्टी कळाल्या. शाळेत सजावट केलेले सर्व तक्ते आणि इतर अभ्यासाच्या गोष्टी, सजावटीच्या गोष्टी सर्व शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांच्या आई वर्गाने खूप छान बनवलेल्या आहेत.

ॲक्टिविटी हॉल मध्ये जेव्हा शिक्षकवर्गाने आपापले मनोगत व्यक्त करून पालकांना संबोधित केले, त्यामुळे पालकांना पण एक नवीन दृष्टिकोन मिळाला. एक पालक म्हणून आम्ही कुठे कमी पडत आहोत याची जाणीव करून दिली. त्याबद्दल खूप आभार. शिक्षकांच्या संबोधनामुळे शिक्षक वर्ग आणि स्वरनादची संपूर्ण टीम क्षमतेपलीकडे जावून मेहनत घेत आहे हे पण समजले. यासाठी स्वरनाद चे मनापासून आभार.

महत्वाचे म्हणजे स्वरनाद शाळेत ठळकपणे दिसून आलेली गोष्ट म्हणजे सर्व शिक्षक वर्ग हा महिलांचा आहे. महिला सक्षमीकरण तर तुम्ही करतच आहात पण महत्वाचे म्हणजे स्त्रीशक्ती जे काम हातात घेतात ते पूर्णत्वास नेतात. त्यामुळे मला एक पालक म्हणून विश्वास आहे की माझा मुलगा स्वराज शिंदे हा नक्की एक परिपक्व आणि सर्वगुण संपन्न होऊनच या समाजामध्ये वावरेल.

पुन्हा एकदा स्वरनाद च्या संपूर्ण टीमचे आणि कळत नकळत या संस्थेला हातभार लावणाऱ्या सर्व ज्ञात अज्ञातांचे मनापासून आभार.

**कुणाल आनंद शिंदे**
पालक, स्वरनाद कोथरूड.

# Events

**<u>दिवाळी उत्सव :</u>**

**कुडाळ केंद्र :**

हा संपूर्ण आठवडा आकाशकंदील बनवणे, पणती रंगवणे, रांगोळी काढणे आणि केलेल्या वस्तू पासून केंद्राची सजावट करून घेणे असे उपक्रम घेण्यात आले व दिवाळी लेसन घेण्यात आला. या कार्यक्रमाला लायन्स क्लब चे सदस्य डॉ. चुबे, डॉ. कुलकर्णी, CA सौदागर व सर्व शिक्षा अभियान च्या शिक्षिका अर्पिता परब पाहुणे म्हणुन उपस्थित होत्या. केंद्रासाठी चुबे सरांनी दोन छोटे स्टूल व अर्पिता मॅडमनी एक स्टडी टेबल भेट दिले. तसेच मुलांना खाऊ वाटप करण्यात आला.

**गोवा केंद्र :**

दिवाळी उत्सवासाठी पर्वरी केंद्रा मध्ये विद्यार्थ्यांकडून आकाशकंदील बनवून घेतले, पणत्या रंगवून घेतल्या. दिवाळी उत्सवाला डॉ. प्रकाश कामत सर प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

फोंडा येथे दिवाळी सण साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थेच्या डॉ. नूतन देव आणि त्यांच्या सहकारी कार्यक्रमाला उपस्थित होत्या. माजी विद्यार्थ्यांनी येऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

**कोथरूड केंद्र :**

कोथरूड केंद्रातील दिवाळीची तयारी आठवडाभर आधीच सुरू झाली होती. वर्ग सजवणे, संपूर्ण शाळा सजवणे, तोरणे बनवणे अश्या सर्व ॲक्टिविटीमध्ये मुलांनी आणि पालकांनी देखील सहभाग घेतला. यावेळी दिवाळीच्या कार्यक्रमासाठी महाले आनंद थरमल सिस्टम्स या कंपनीत बरीच वर्षे इंडिया हेड ऑपरेशन्स (Mahle Anand Thermal Systems Pvt Ltd) या वरिष्ठ पदावर कार्यरत असणाऱ्या श्री. आनंद जोशी यांना आमंत्रित केले होते.

दिवाळी सणाचे महत्व समजावून सांगणारा लेसन सोनाली करमरकर आणि शांती रोकडे मॅडम यांनी घेतला. प्रत्यक्ष भाऊबीज साजरी केली. पाहुण्यांना भेटवस्तू आणि भेटकार्ड मुलांनी दिले. सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना दिवाळीचा फराळ आणि पक्वान्न चे जेवण देवून कार्यक्रमाची सांगता झाली.

**स्वरनाद कोथरूड आणि पुसाळकर स्वरनाद मधील सहामाही परीक्षा :**

दिनांक १ नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबर या कालावधीत स्वरनाद कोथरूड आणि पुसाळकर केंद्रा मध्ये मुलांच्या सहामाही परीक्षा घेण्यात आल्या. मुले अगदी मोठ्या मुलांसारखी परीक्षेची तयारी करून आली होती. परीक्षेसाठी पॅड, पेन्सिल इ. साहित्य मुलांनी आणले होते आणि प्रत्येक जण अगदी शिक्षकांनी दिलेल्या जागेवर बसून कोणाकडे न बघता परीक्षेचा पेपर लिहीत होते.

पुसाळकर स्वरनाद मध्ये देखील अगदी असेच चित्र होते. एवढ्या लहान मुलांनी मोठ्या मुलांसारखी परीक्षा देणे हे खूपच आश्चर्यचकित करणारे आहे.

**कुटुंब दिन :**

दिनांक २५ नोव्हेंबर, २०२३ रोजी स्वरनाद कोथरूड येथील विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या कुटुंबासाठी कुटुंब दिन साजरा करण्यात आला. स्वरनाद चा कुटुंब दिन साजरा करण्या मागचा उद्देश फक्त संस्था काय काम करते हे पालकांना दाखवणे हा नसून तर संस्थेतील मुलांच्या सर्वांगीण विकासामध्ये कुटुंबातील सर्व व्यक्तींचा सहभाग कसा महत्वाचा आहे याची जाणीव करून देणे हा आहे. आणि म्हणूनच यावेळच्या कुटुंब दिनाचे वैशिष्ट्य हे होते की संस्थेतील विशेष शिक्षक तसेच त्या व्यतिरिक्त जी तज्ञ मंडळी स्वरनाद मध्ये आपली विविध कौशल्ये वापरुन मुलांच्या सर्वांगीण विकासामध्ये सहभाग देतात त्या सर्वांशी प्रत्यक्ष संवाद साधणे. यावर्षी

कुटुंब दिनाच्या दिवशी Occupational Therapist, AVT Therapist, Audiologist, मुख्याध्यापिका, समुपदेशक आणि शिक्षण संचालिका सौ. रक्षा देशपांडे या सर्व तज्ञ व्यक्तींच्या बरोबर पालकांना चर्चा करायला संधी मिळाली.

**तुळशीचे लग्न आणि त्रिपुरी पौर्णिमा :**

दिनांक २४ नोव्हेंबर, २३ रोजी पुसाळकर स्वरनाद निवासी माता बालक केंद्रात तुळशीचे लग्न हा कार्यक्रम थाटा माटात पार पडला. वर म्हणून बाळकृष्ण आणि वधू म्हणून तुळस असा हा विवाह सनई चौघड्याच्या साथीने पार पडला. मुलांनी खूपच आनंद घेतला. त्यानंतर लगेच दि. २७ रोजी त्रिपुरी पौर्णिमा साजरी केली. सर्वत्र पणत्या लाऊन अंगण दिव्यांनी उजळून गेले होते.

**Participation in The National Conference of The Indian Society of Otology:**

As part of The Indian Society of Otology- (group of ENT surgeons) ongoing national conference at hotel JW Marriot, Senapati Bapat road, a rally for awareness of Noise Pollution and early detection and early rehabilitation of deafness was organised on 26/11/2023, from JW Marriot Hotel, Senapati Bapat Marg to Vishwa Bhavan, Symbiosis College. About 150 ENT surgeons including Dr. Avinash Wachasundar, Education Director Mrs. Raksha Deshpande, Teachers and staff of Cochlea Pune for Hearing and Speech, students and doctors from Bharati Vidhyapeeth - School of Audiology and Speech Language Pathalogy participated in this rally.

At the gate of Symbiosis College, students of Bharati Vidhyapeeth- School of Audiology and Speech Language, performed an impressive street play on awareness of Noise Pollution and sound menace, on the other hand, teachers of Cochlea Pune for Hearing and Speech performed a phenomenal street play on awareness of detection and rehabilitation of born deaf children.

| | Swaranaad Reahabilitation Center | | Swaranaad Outreach Centers | |
|---|---|---|---|---|
| | Monthly Achievement - Novembar 2023 | | Monthly Achievement – Nov -23 | |
| Sr.No. | Facilities | Session/ Student Count | Centers | Thearapy sessions |
| 1 | Speech Thearapy Sessions | 65 | Khed | 43 |
| 2 | No. of student getting Speech Thearapy | 35 | Narayangoan | 48 |
| 3 | Aided Audiogram Testing | 5 | Pimpari | 50 |
| 4 | No. of Speech Assessment | 3 | Chinchwad | 45 |
| 5 | No. of Counselling Sessions | 15 | Phonda | 15 |
| 6 | Individual Occupational Tearapy Sessions | 17 | Porvorim | 34 |
| 7 | No.of students getting individual Occupational thearapy | 40 | Manchar | 35 |
| 8 | Group Occupatioanal Thearapy Sessions | 2 (by Thearapiest) 10 (by Teachers ) | Daund | 24 |
| 9 | Psychological Assessment | 0 | Urawade (Residential) | 45 |

# संस्थेची केंद्र

- **कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
  बिंदू माधव ठाकरे दवाखाना, गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
  कोथरूड पुणे-४११०३८
  **संपर्क**:
  रक्षा देशपांडे- ९९२३२८९८४४ /
  अभिलाषा अग्निहोत्री – ९३७१४२०९९४

- **वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
  मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी चिंचवड लिंक रोड.
  शेवटचा पी. एम. टी. बसस्टॉप समोर,
  चिंचवडगाव, पुणे- ४११०३३
  फोन नं. ९८२२६७१८४०

- **वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
  डॉ. खडके गेस्ट हाऊस, राजगुरुनगर बाजारपेठ, ता. खेड पुणे
  फोन नं.९८५०७३८२७६

- **वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र , नारायणगाव**
  डॉ. खैरे जीवन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल नारायणगाव जुन्नर रोड पुणे
  फोन नं.९७६६२६२३२७

- **'स्वरनाद' कर्णबधिर बालकांची पूर्व प्राथमिक शाळा, पर्वरी-गोवा**
  अनघा, प्लॉट नंबर १५, पीडीए कॉलनी, पर्वरी बार्देश
  गोवा, ४०३५२१
  फोन नं. ९६२३७०१०२०

- **श्री शारदा ग्रंथ प्रसारक संस्था, संचालित स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी पूर्व-प्राथमिक विद्यालय**
  एफ ४, पहिला मजला, पै हाऊस सदन,
  फोंडा गोवा-४०३४०१
  फोन नं.९६२३७०१०२०

- **वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
  वाय. सी. एम. हॉस्पिटल,
  (पिंपरी चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी
  फोन नं. ८०८७२२९९५४

- **वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दौंड**
  शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट सी विंग,फ्लॅट नं. २,
  फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे
  फोन नं. ७०४०६६८०७१/ ८६६८८३१२११

- **वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, मंचर**
  डॉ. तोडकर हॉस्पिटल, पिंपळगाव फाटा,
  मंचर ता. आंबेगाव जि. पुणे
  फोन नं.८४५९०१९६०२

- **वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दापोली**
  डॉ. गांगुर्डे क्लिनिक,
  अ/१/२ श्रुती अपार्टमेंट, केळुस्कर नाका,
  ता. दापोली जि. रत्नागिरी
  फोन नं.९४०५१५९६९४

- **वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
  लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनव नगर
  ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
  फोन नं.९४०५९९८९८९

**"पुसाळकर स्वरनाद" माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
मॉंटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५, उरावडे,
पिरंगुट, ता. मुळशी, पुणे- ४१२११५
फोन नं. ८३०८८३२१४५



कुटुंब दिनानिमित्त आलेले पालक ग्रंथलयातील लेसन चार्ट बघतांना



कुटुंब दिनानिमित्त ऑडिओलॉजिस्ट ऑडिओलॉजी बाबत माहिती देतांना




कुटुंब दिनानिमित्त विशेष शिक्षिका आलेल्या कुटुंबांना शाळेची भेट घडवतांना



OT Room मध्ये पालक थेरपीचे निरीक्षण करतांना

RNI No : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015
Registration no. : PCW/195/2023-2025

Published and Posted on 10th December2023
Posted at Model Colony PSO Pune 411016
on 10th of each month




Rally for Awareness of Noise Pollution and Early Detection and
Early Rehabilitation of Deafness



प्रश्नमंजुषा १ च्या विजेत्या
सौ. वनिता साबळे
पारितोषिक स्वीकारातांना



प्रश्नमंजुषा २ च्या विजेत्या
सौ. मेघा कदम
पारितोषिक स्वीकारातांना



प्रश्नमंजुषा ३ चे विजेते
सागर खामकर
पारितोषिक स्वीकारातांना

Address :
To,